# आशा गमावू नका!



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Don’t Lose Hope)

# आशा गमावू नका!

# अनुक्रमणिका


1. जीवन नेहमीच सोपे नसते 1
2. आशा—आमच्या ख्रिस्ती जीवनाचा अत्यावश्यक भाग 3
3. आशेचे महत्व 5
4. निराशाजनक परिस्थितींस बदलून टाकणारा परमेश्वर 8
5. निराशाजनक परिस्थितीत आशा बाळगण्याचा आधार 13
6. आशाहीन परिस्थितीत मी काय करतो? 19

# 1
# जीवन नेहमीच सोपे नसते

आपण सर्वजण आपल्या जीवनाचा प्रवास अनेक स्वप्ने, ध्येय, महत्वाकांक्षा तसेच इच्छा-आकांक्षा घेऊन करीत असतो मोठ्या उत्साहाने, आपण योजना बनवतो की आपल्याला काय करायचे आहे, आपल्याला कुठे जायचे आहे आणि आपल्याला आयुष्यात काय बनायचे आहे. पण कुठेतरी या प्रवासात असतांना, आम्हाला खात्री आहे की आम्हाला वादळी हवामानास तोंड द्यावे लागेल जीवन हे नेहमीच सोपे नसते. आम्ही बरेचदा अशी इच्छा धरतो की जीवन हे एखाद्या गोष्टीच्या पुस्तकासारखे सोपे असावे, पण नेहमीच असे घडत नाही! वाटेत अनपेक्षित आव्हाने, अडचणी आणि परिस्थिती निर्माण होतात. अशा वेळी आमचे ध्येय आणि स्वप्ने दूर होत आहेत असे वाटू लागते. कधी कधी, आम्ही स्वतःला अशा परिस्थितींत पाहतो ज्या जवळ जवळ निराशाजनक वाटतात. आम्ही आशा गमावू लागतो. आमची हिम्मत खचू लागते. आम्ही विचार करू लागतो, “मी कधीही यातून बाहेर पडू शकणार नाही” किंवा “मी कधीही माझ्या ध्येयांप्रत पोहोचू शकणार नाही.”आम्ही आपले ध्येय गाठण्यास समर्थ होऊ किंवा नाही या विषयी आम्ही निराश होतो.

कधी कधी, जीवनास अनपेक्षित वळण येते, आणि ज्या परिस्थितींसाठी आम्ही पूर्णपणे तयार नसतो त्या आमच्यापुढे प्रगट होतात. आम्ही स्वतःला रस्त्याच्या शेवटास पोहोचलेले पाहतो जेथून मागे वळण्याचा मार्ग दिसत नाही. हे पुस्तक वाचणारे तुमच्यापैकी काही जण कदाचित निराशाजनक स्थितीमध्ये असू शकतात. हे तुमची नोकरी, कारकीर्द, शिक्षण, घर, विवाह, अथवा कुटुंबाशी संबंधित

बाब असू शकते. जीवनात अनेक गोष्टी चुकल्या असतील. पण मी तुम्हाला प्रोत्साहन देऊ इच्छितो की पवित्र शास्त्राचा परमेश्वर मृतांस जीवन देण्यात—स्थिती आणि परिस्थिती ज्या मृत आणि निराशाजनक भासतात त्या बदलण्यास तज्ञ आहे. निराशाजनक परिस्थितींना पार बदलून टाकण्यात तो तरबेज आहे. आमेन! तो तुमच्या पक्षास असतांना, तुम्ही आशेविरुद्ध आशा बाळगू शकता. प्रत्येक गोष्ट निराशाजनक दिसत असतांनाही, तुम्ही विजयी होऊन बाहेर पडू शकता. या पुस्तकातील प्रोत्साहनाचे साधे शब्द आम्ही आशा सोडू नये असे आवाहन करते.

## आशा बाळगण्याचे महत्व

आशा बाळगणे अतिशय महत्वाचे आहे. “आशे” द्वारे, आमचा अर्थ आहे, शक्यता, अपेक्षा, असे काही ज्याची आम्ही आस धरतो, इच्छा, स्वप्न अथवा आकांक्षा. ख्रिस्ती जीवनाच्या महत्वपूर्ण पैलूंपैकी एक आहे आशा. पवित्र शास्त्र तीन गोष्टींचा उल्लेख करते ज्या आमच्या ख्रिस्ती जीवनाच्या वाटचालीत महत्वाच्या आहेत; त्यापैकी एक आहे आशा.

**1 करिंथ 13:13**

**सारांश, विश्वास, आशा, प्रीति ही तिन्ही टिकणारी आहेत; परंतु त्यांत प्रीति श्रेष्ठ आहे.**

# 2
# आशा—आमच्या ख्रिस्ती जीवनाचा अत्यावश्यक भाग

विश्वासणारे म्हणून, आम्ही अनेक गोष्टींची आशा धरतो ज्या अद्याप यावयाच्या आहेत.

## सार्वकालिक जीवनाची आशा

**तीत 1:2**
**जे युगानुयुगाचे जीवन सत्यप्रतिज्ञ देवाने युगाच्या काळापूर्वी देऊ केले आणि त्याविषयीचे वचन त्याच आपल्या तारणाऱ्या देवाच्या आज्ञेने मला सोपवलेल्या घोषणेत यथाकाळी त्याने प्रकट केले.**

आपण सार्वकालिक जीवनाची आशा धरतो. सार्वकालिक जीवन हे आपल्या आत्म्यामध्ये असले तरी, आपण त्याची वाट पाहत आहोत.

## गौरवाची आशा

**कलस्सै 1:27**
**ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ति परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे.**

आमच्यामध्ये खिस्त आमच्या गौरवाची आशा आहे. तो येणाऱ्या जगातील जीवनासाठी आमची आशा आहे, असे जग जे आम्ही सांप्रतकाळी राहत असलेल्या जगापेक्षा फार उत्तम आहे. आम्ही स्वर्गात देवाच्या सान्निध्यात त्याच्यासोबत आमचा वेळ घालविण्याची आशा धरतो.

## तारणाची आशा

**1 थेस्सल 5:8**

**परंतु जे आपण दिवसाचे आहोत त्या आपण सावध असावे; विश्वास व प्रीति हे उरस्त्राण व तारणाची आशा हे शिरस्त्राण घालावे.**

**1 पेत्र 1:7-9**

**7 ह्यासाठी की, नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करतात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावे.**

**8-9 त्याला पाहिले नसताही त्याच्यावर तुम्ही प्रीति करता; आता तो दिसत नसता त्याच्यावर विश्वास ठेवता; आणि त्या विश्वासाचे पर्यवसान जे आपल्या जिवांचे तारण, ते उपभोगत अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदाने उल्लासता.**

तारणाची सुरूवात आता होते, पण आमच्या तारणाचा असा भाग देखील आहे ज्याची आम्ही आशा धरतो.

## ख्रिस्ताच्या पुनरागमनाची आशा

**तीत 2:13**

**धन्य आशाप्राप्तीची म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रकट होण्याची वाट पाहत...**

## पुनरूत्थानाची आशा

**प्रेषितांची कृत्ये 24:15**

**आणि, नीतिमानांचे व अनीतिमानांचे पुनरुत्थान होईल, अशी जी आशा ते धरतात तीच आशा मी देवाकडे पाहून धरतो.**

# 3
# आशेचे महत्व

आमच्या रोजच्या जीवनात आशा बाळगणे अतिशय महत्वाचे आहे. निराशाजनक परिस्थितीतही आम्ही आशेने भरलेले लोक असले पाहिजे. आशा बाळगत राहणे का महत्वाचे आहे याची अनेक कारणे आहेत.

## आशा लांबणीवर पडली असता अंतःकरण कष्टी होते

**नीतिसूत्रे 13:12**
**आशा लांबणीवर पडली असता अंतःकरण कष्टी होते, पण इष्टप्राप्ती जीवनाचा वृक्ष आहे.**

कधी कधी, ज्या गोष्टींची आशा आम्ही धरली आहे त्या प्राप्त होण्यात विलंब होतो. एखादी विशिष्ट गोष्ट ठराविक वर्षात पूर्ण व्हावी, अशी आपली अपेक्षा असते, पण वर्षाच्या शेवटीही ते घडून येत नाही. आम्ही स्वतःला सांगतो की कदाचित ते येणाऱ्या वर्षात घडून येईल आणि कदाचित तेव्हा देखील ते घडत नाही. जेव्हा आशा धरलेल्या गोष्टीत विलंब होतो, तेव्हा आमचा अंतरात्मा पूर्णपणे आशा गमावू लागतो आणि दुर्बळ होतो. दुसरीकडे, जेव्हा आपण आशा ठेवलेली वस्तू येते, तेव्हा ते जीवनाच्या झाडासारखे असते. ते आम्हांस उत्साहित आणि टवटवित करते. आम्हाला ताजेतवाणे आणि पुन्हा नवीन झाल्यासारखे वाटते. आमचा विश्वास उंच भरारी मारतो. आम्हांस प्रेरणा प्राप्त होते आणि आम्ही पुढे वाढू शकतो.

## आशा आपल्या जिवासाठी नांगर अशी आहे

**इब्री 6:19 अ**
**ती आशा आपल्या जिवासाठी जिवाचा नांगर अशी असून, ...**

आशा आपल्या जिवासाठी नांगर अशी आहे. “जीव” हा शब्द मन, इच्छा आणि भावनांचा उल्लेख करतो. जीवाच्या संबंधात आशेची भूमिका स्पष्ट करण्यासाठी येथे जहाजातून नांगर टाकण्याच्या उदाहरणाचा उपयोग करण्यात आला आहे. जेव्हा समुद्रात नांगर टाकला जातो तेव्हा ते वादळाच्या परिस्थितीत स्थैर्य घेऊन येते. पवित्रशास्त्र म्हणते की आशा हा *जीवाचा नांगर आहे*. याचा अर्थ असा की जर मला आशा नसेल, तर माझ्या जीवाला—माझी इच्छा, भावना आणि बुद्धी—संकटसमयात आवश्यक असलेले स्थैर्य किंवा बळ असणार नाही. जेव्हा लोक पूर्णपणे आशा गमावतात, तेव्हा जीवनाची वादळे इतकी प्रबळ होतात की पुढे जाणे कठीण वाटू लागते. ते निराश होऊन  सहजपणे हार मानतात. जगण्यामागे काही कारण आहे का, असा प्रश्न त्यांना पडू लागतो. नैराश्याचे विचार, “कोणाला माझी पर्वा नाही,” “सर्व काही चुकले आहे” आणि “ते कधीच ठीक होऊ शकत नाही” यासारखे विचार त्यांच्या मनाला सतत भेडसावत असतात. अशा वेळी अनेक जण आत्महत्येचा विचारही करतात. म्हणूनच, अत्यंत कठीण परिस्थितीतही आशा न गमावणे फार महत्वाचे आहे. आशा हा जीवाचा नांगर आहे.

## आशा हे विश्वासाचे पहिले पाऊल आहे

**इब्री 11:1**
**विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.**

आशा ही महत्वपूर्ण आहे कारण विश्वास आशेवर अवलंबून आहे. आशा ही विश्वासापूर्वी येते. जेव्हा आपल्याला आशा असते

तेव्हाच आपण विश्वास ठेवू शकतो. अशा व्यक्तीचा विचार करा ज्याला प्राणघातक रोग झालेला आहे आणि डॉक्टरांनी म्हटलेले आहे की त्याच्या मदतीसाठी वैद्यकीय शास्त्र काहीही करू शकत नाही आणि त्या व्यक्तीला जगण्यासाठी फक्त काही दिवस आहेत. अशा परिस्थितीत बहुतेक लोक सर्व आशा सोडून देण्याची शक्यता आहे. त्याच्या अंतिम क्षणांची चित्रे, त्याचे अंतिम शब्द आणि त्याचा अंत्यसंस्कार या विषयीचे विचार त्याच्या मनात धुमसत असतील. जेव्हा व्यक्ती आशा सोडतो, तेव्हा विश्वास देखील कार्य करू शकत नाही कारण *"विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा"* आहे. जेव्हा व्यक्तीला बरे होण्याची आशा देखील नसते, तेव्हा देवाकडून आरोग्य प्राप्त करण्यासाठी विश्वास बाळगणे अतिशय कठीण असते. देवावर विश्वास ठेवण्यासाठी आशा ही पूर्वअट आहे. आजारी व्यक्तीने किमान स्वतःला बरे होण्याची आणि मृत्यूशय्येतून बाहेर पडण्याची कल्पना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. डॉक्टरांनी आशा सोडली असेल, पण त्याने ही आशा धरली पाहिजे की स्वर्गाचा परमेश्वर त्याला बरे करू शकतो आणि तसे करण्याची त्याची इच्छा आहे. पूर्ण बरे होण्याची आशा बाळगल्याने विश्वास बरे होण्यात आपली भूमिका बजावू शकेल.

# 4
# निराशाजनक परिस्थितींस बदलून टाकणारा परमेश्वर

आपण हे समजून घेतले पाहिजे की आपण कोणत्याही परिस्थितीत असलो तरीही, परिस्थिती कितीही निराशाजनक वाटली तरीही, एक परमेश्वर आहे जो निराशाजनक परिस्थितींना बदलण्यात पारंगत आहे. आमेन! कदाचित तुमची निराशाजनक परिस्थिती तुमचा विवाह, तुमची नोकरी, मुले, आर्थिक स्थिती, कारकीर्द, शिक्षण अथवा आणखी काही असेल. ते काहीही का असेना, फक्त या वस्तुस्थितीवर लक्ष केंद्रित करा की आम्ही अशा देवाची सेवा करतो जो निराशाजनक परिस्थितींस बदलून टाकतो. म्हणूनच आम्हांला आशा सोडावयाची नाही. आपण पवित्र शास्त्रातून काही परिचित उदाहरणे पाहू या जेथे परमेश्वराने निराशाजनक परिस्थितींस बदलून टाकले.

## गरीब विधवा

अशा स्त्रीचा विचार करा जिचा नवरा मरण पावला, तिला त्यांच्या दोन मुलांसह खूप मोठे कर्ज सोडून गेला (2 राजे 4:1-7). सावकार येऊन पैशे मागू लागले आणि तिच्या मुलांना उचलून नेण्याची धमकी देऊ लागले. ह्या स्त्रीची परिस्थिती खरोखर निराशाजनक होती! ती अलीशा नावाच्या देवाच्या सेवकाकडे गेली, तिने तिच्या दुर्दशेचे वर्णन केले आणि मदत मागितली. त्याने तिला विचारले की घरी तिच्याजवळ काय आहे. तिने उत्तर दिले की तिच्याजवळ फक्त एक तेलाचे भांडे आहे. अलीशाने तिला सांगितले की तिने जाऊन शक्य तितकी भांडी घेऊन यावे आणि प्रत्येक भांड्यात तिच्याजवळचे तेल ओतावे. चमत्कारिकरित्या, तिचे तेल वाढू लागले आणि सर्व भांडी तेलाने भरून

गेली. त्यानंतर अलीशाने तिला तेल विकून कर्ज फेडण्याची आणि नव्याने सुरुवात करण्याची सूचना दिली. देवाने चमत्कारिकरित्या या स्त्रीच्या गरजा पुरवून तिची निराशाजनक परिस्थिती बदलून टाकली.

## लग्नाच्या मेजवानीच्या वेळी चमत्कार

एका लग्नाच्या मेजवानीच्या यजमानाचा द्राक्षरस संपला—उणीवेची एक साधारण पण तरीही निराशाजनक परिस्थिती. काय करावे असा ते विचार करीत असतांना, येशूची आई मरीया हिने लग्नाच्या मेजवानीतील चाकरांना सांगितले की येशू त्यांना जे काही करावयास सांगेल ते त्यांनी करावे. येशूने त्यांना आज्ञा दिली की त्यांनी पाण्याची भांडी पाण्याने भरावी आणि मग ते पाहूण्यांजवळ नेऊन त्यांस द्यावे. अलौकिकरित्या पाण्याचा द्राक्षरस झाला आणि लग्नात आलेल्या प्रत्येकाला तो पुरेसा झाला (योहान 2:1-11). चमत्कारपूर्ण तरतूदीचे दुसरे उदाहरण! प्रभूचा सल्ला ऐकल्याने आणि तो जे काही म्हणतो ते केल्याने निराशाजनक परिस्थिती पार बदलू शकते.

## निराशाजनक रात्रीनंतरची सकाळ

व्यापारातील चमत्कार जो प्रभू येशूने केला तो आमच्यासाठी लूक 5 मध्ये नमूद करण्यात आला आहे. पेत्र आपल्या "व्यापारातील सोबत्यांसह"—याकोब, योहान आणि आंद्रिया—मासेमारीचा व्यवसाय करीत होते. ते मासेमार होते. एका प्रसंगी, त्यांनी संपूर्ण रात्र मासे धरण्याचा प्रयत्न करण्यात घालविली आणि त्यांच्या हाती काहीही आले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी, ते परत येत असताना, प्रभु येशू त्यांना भेटला. त्याचा उपदेश ऐकण्यासाठी जमलेल्या लोकसमुदायाला प्रचार करण्यासाठी त्याने त्यांच्या बोटीचा वापर करण्याची विनंती केली. वचनाचा प्रचार केल्यानंतर, प्रभुने पेत्राला पुन्हा एकदा समुद्रात जाण्यास आणि भरपूर मासे पकडण्यासाठी आपले जाळे बाहेर टाकण्यास सांगितले. पेत्राने उत्तर दिले, *"गुरूजी, आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो"* (लूक 5:5). पेत्राला

माहीत होते की त्याच्या प्रयत्नाने काहीही फळ आले नव्हते. आणि तरीही, येशूने त्याला जे करण्यास सांगितले ते करण्यास तो तयार होता.

प्रभूच्या एका शब्दाने ती निराशाजनक परिस्थिती पार बदलून गेली. प्रभू येशूने जे सांगितले होते त्याप्रत पेत्राच्या त्वरित आज्ञापालनाने त्याच्यासाठी "आर्थिक चमत्कार" घडवून आणला.

## इस्राएल राष्ट्र

यहूदी लोक जगभर विखुरले गेले आणि पांगले. निराशेच्या भावनेने यहूदी लोकांस जखडून टाकले होते. यहेज्केल 37 मध्ये, देवाने इस्राएल लोकांच्या स्थितीचे वर्णन करण्यासाठी यहेज्केलला शुष्क अस्थींनी भरलेले खोरे दाखवले. *"तेव्हा तो मला म्हणाला, मानवपुत्रा, ह्या अस्थि म्हणजे सारे इस्राएल घराणे होय; पाहा, ते म्हणतात, 'आमच्या अस्थि शुष्क झाल्या आहेत, आमची आशा नष्ट झाली आहे, आमचा साफ उच्छेद झाला आहे'"* (यहेज्केल 37:11).

मग देवाने यहेज्केलला कोरड्या हाडांना भविष्यवाणी करण्याची सूचना दिली. *"म्हणून संदेश देऊन त्यांना सांग, प्रभु परमेश्वर म्हणतो, माझ्या लोकांनो, पाहा, मी तुमच्या कबरा उघडीन, तुम्हांला आपल्या कबरांतून बाहेर काढून इस्राएल देशात आणीन"* (यहेज्केल 37:12). संदेष्ट्याद्वारे, देवाने यहूदी लोकांचे परत एकत्र येणे आणि राष्ट्र म्हणून इस्राएलच्या पुनर्स्थापनेचे भाकीत केले. देवाने त्याचे वचन पूर्ण केले आणि 14 मे, 1948, रोजी इस्राएलची राष्ट्र म्हणून घोषणा करण्यात आली. संपूर्ण जगातून यहूदी लोक त्यांच्या देशात परत येऊ लागले.

म्हणून, आपण ज्याला निराशाजनक परिस्थिती समजू शकतो, देव त्याला बदलू शकतो. परिस्थिती बदलण्यासाठी देव "थडगी" उघडण्यास आणि "शुष्क अस्थींना" जीवन देण्यास इच्छुक आणि समर्थ आहे! देवासाठी इतके निराशजनक काहीही नाही जे तो बदलू

शकत नाही.

## अब्राहाम आणि सारा

अब्राहाम आणि सारा वयोवृद्ध झाले होते जेव्हा प्रभूने त्यांना त्यांच्या स्वतःच्या मुलाचे अभिवचन दिले. त्याने त्यांना पुत्राचे अभिवचन दिले आणि सांगितले की या पुत्राद्वारे त्यांना आकाशातील तारे आणि समुद्रतटावरील वाळूच्या कणांइतकी अगणित संतती होईल. जेव्हा मुलास जन्म देण्याची वेळ आली तेव्हा ते निराशाजनक परिस्थितीत होते कारण इतक्या वर्षात त्यांना काहीही झाले नव्हते. अब्राहम 99 वर्षांचा होता आणि साराचा गर्भ इतका काळ वांझ होता—एक निराशाजनक परिस्थिती.

त्या परिस्थितीबद्दल पवित्र शास्त्र काय म्हणते ते येथे दिले आहे.

**रोम 4:17,18**
**17 "मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे" असे अब्राहामाविषयी शास्त्रात जे लिहिलेले आहे—त्याप्रमाणे तो आपल्या सर्वांचा बाप आहे. ज्या देवावर त्याने विश्वास ठेवला, जो देव मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो, त्याच्या दृष्टीने तो असा आहे.**
**18 "तशी तुझी संतती होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.**

अनुसरण करता यावे असे किती उत्तम उदाहरण आहे. अब्राहामाने *"आशेला जागा नसताही आशेने विश्वास ठेवला"* जेव्हा आशा बाळगण्याचे कुठलेही कारण नव्हते, जेव्हा आशा बाळगण्याचे कोणतेही कारण नव्हते, तेव्हा अब्राहामने देवाने सांगितलेल्या आशेवर विश्वास ठेवला. आणि आशेवर विश्वास ठेवल्यामुळे, *"म्हटलेल्या वचनानुसार तो झाला."*

जेव्हा देव तुम्हाला वचन देतो, तेव्हा असे कधीही म्हणू नका, "प्रभु, हे अभिवचन हास्यास्पद आहे." हे हास्यास्पद असू शकत

नाही कारण आपला देव असा परमेश्वर आहे जो मृतांना जीवन देतो. म्हणून, जेव्हा देव तुम्हाला अभिवचन देतो तेव्हा परिस्थिती कितीही निराशाजनक वाटत असली तरीही हरकत नाही. फक्त लक्षात ठेवा की हा देव जो तुमच्याशी बोलत आहे, तोच देव आहे जो मृतांस जीवन देतो—जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो—आणि कोणत्याही प्रकारची परिस्थिती का असेना ती बदलण्यास तो समर्थ आहे. देव केवळ परिस्थितीत सुधारणा करण्यास समर्थ नाही तर ती पार बदलून टाकण्यास देखील समर्थ आहे! अस्तित्वात नसलेल्या गोष्टी तो अस्तित्वात आणू शकतो. सध्या, घरात शांतता अस्तित्वात नसेल, परंतु देव ती अस्तित्वात आणू शकतो. तुमच्या शरीरात आरोग्य अस्तित्वात नसेल, परंतु देव ते अस्तित्वात आणू शकतो. तुमच्या घरात, नोकरीत किंवा कारकीर्दीमध्ये यश अस्तित्वात नसेल, पण देव ते अस्तित्वात आणू शकतो.

# 5
# निराशाजनक परिस्थितीत आशा बाळगण्याचा आधार

निराशाजनक परिस्थितीत आशा बाळगण्याचा आधार काय आहे? ही फक्त कल्पना आहे का? हा मनाच्या शक्तीद्वारे भौतिक परिस्थितीवर नियंत्रण करण्याचा प्रश्न आहे का? ही सकारात्मक असण्याची बाब आहे का—सकारात्मक असण्याचा आणि राहण्याचा मानवतावादी दृष्टिकोन? अत्यंत बिकट परिस्थितीतही आपण आशा बाळगू शकतो याचे कारण फक्त देव आणि त्याचे वचन आहे.

**रोम 4:18**
**"तशी तुझी संतति होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.**

विश्वास करण्याचे कारण नसतांनाही देवाने जे अभिवचन दिले होते त्यावर अब्राहामाने विश्वास ठेवला. जेव्हा स्थिती निराशाजनक होती, तेव्हा देखील विश्वास केला. का? कारण देवाने ते म्हटले होते! त्याने दिलेल्या *"वचनाप्रमाणे"* आशेत विश्वास ठेवला. तो त्याच्या आशेचा आधार होता. देवाने म्हटले होते, आणि जरी परिस्थिती निराशाजनक होती, तरीही अब्राहामाने आशेला जागा नसतांनाही विश्वास ठेवला.

## देव आणि त्याचे वचन आपल्या आशेचा आधार बनतात

**स्तोत्रसंहिता 38:15**
**हे परमेश्वरा, मी तुझी आशा धरली आहे; हे प्रभू, माझ्या देवा, तू माझे ऐकशील.**

**स्तोत्रसंहिता 130:5**
**मी परमेश्वराची अपेक्षा करतो, माझा जीव अपेक्षा करतो, आणि मी त्याच्या**

**वचनाची आशा धरतो.**

**रोम 15:4**
**धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरता लिहिले.**

देव आमच्या आशेचे कारण, उगम आणि सामर्थ्य आहे. त्याचे वचन आमच्या आशेचा आधार ठरते. शास्त्रवचनांद्वारे आपल्या अंतःकरणात आणलेल्या संयमामुळे आणि सांत्वनामुळेच आपण आपली आशा टिकवून ठेवतो.

## भविष्याची आशा

आतापर्यंत आम्ही जे काही वाचले आहे त्याचा व्यावहारिक पैलू पाहू या. तुमच्यापैकी काही जे हे वाचत आहेत कदाचित म्हणून शकतात, "माझ्याजवळ भविष्याची काही आशा नाही" किंवा "मला वाटत नाही की मी फार पुढे जाईन. माझ्या जीवनात फारसे काही घडणार नाही." देवामुळे आणि त्याच्या वचनामुळे आपण भविष्यासाठी आशा बाळगू शकतो हे आपण जाणून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. त्याचे वचन म्हणते,

**1 करिंथ 2:9**
**हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे,**
**"डोळ्यांनी जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही**
**व माणसाच्या 'मनात जे आले नाही,**
**ते आपणावर प्रीती करणाऱ्यांसाठी**
**देवाने सिद्ध केले आहे."**

आमच्याजवळ भविष्यासाठी आशा आहे. आम्हाला आशा आहे की आम्ही भविष्यात काही अद्‌भुत गोष्टी पाहणार आहोत. का? देवाच्या वचनामुळे जे म्हणते की देवाने त्याच्यावर प्रीती करणाऱ्या लोकांसाठी अशा गोष्टी सिद्ध केल्या आहेत.

**यिर्मया 29:11**
**परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.**

हा आमच्या आशेचा आधार आहे—वचन. म्हणून, आपण उत्तम भविष्याची आशा धरू शकतो. आमची सध्याची परिस्थिती आमचे अंतिम लक्ष्यस्थान दर्शवित नाही. आम्हाला आशा आहे की देवाने त्याच्या वचनात दिलेल्या अभिवचनांमुळे आमचे भविष्य बलवान, यशस्वी आणि सुरक्षित राहणार आहे. आम्ही आमच्या वर्तमान परिस्थितींना आम्हांस खाली दाबून ठेवण्याची परवानगी देणार नाही.

## यशस्वी होण्याची आशा

तुमच्यापैकी काही जनांच्या मनात नकारात्मक विचार असतील आणि तुम्हाला वाटत असेल की तुम्हाला कधी जीवनात यश प्राप्त होईल का. तुम्ही जो काही प्रयत्न केला आहे तो कदाचित अयशस्वी झाला असेल आणि आतापर्यंत तुम्ही कोणत्याही गोष्टीत यशस्वी झाला नसाल. देवाचे वचन जे म्हणते त्यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे.

**स्तोत्रसंहिता 1:1-3**
**1 जो पुरुष दुर्जनांच्या मसलतीने चालत नाही;**
**पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही;**
**आणि निंदकांच्या बैठकीत बसत नाही,**
**2 तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो,**
**त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य.**
**3 जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते,**
**जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत,**
**अशा झाडासारखा तो आहे;**
**आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते.**

फलद्रुप वृक्षासमान स्वतःची कल्पना करा. स्वतःला असा व्यक्ती

म्हणून पहा जो तो करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीत यशस्वी होतो. तुमच्या जीवनासंबंधाने देवाचे हे अभिवचन आहे आणि देव तुमच्यासाठी जे काही करू इच्छितो त्यापासून कुठल्याही परिस्थितीला तुम्हास वंचित ठेवू देऊ नका.

## तुमची स्वप्ने पूर्ण करण्याची आशा

तुमच्यापैकी काहींनी तुमची स्वप्ने कधी साध्य होतील याविषयी आशा धरणे सोडले असेल. देवाचे वचन म्हणते,

**स्तोत्रसंहिता 37:4**
**म्हणजे परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल; तो तुझे मनोरथ पूर्ण करील.**

मी अशा परिस्थितींत राहिलो आहे जेव्हा मला वाटत असे की मी कधीही माझी स्वप्ने पूर्ण करू शकणार नाही. मला आठवते की मी मोठा होत असतांना, बँगलोर शहरात अशी मजबूत मंडळी स्थापन करण्याचे स्वप्न पाहत होतो जी जगातील राष्ट्रांवर प्रभाव टाकेल. अनेक गोष्टी घडल्या आणि मी स्वतःला अशा परिस्थितींत पाहिले ज्यामुळे मी विचार करू लागलो की मला कधीही माझी स्वप्ने साध्य करता येणार नाहीत. मला असे वाटू लागले होते की ते फक्त स्वप्नच राहणार. असे वाटू लागले होते की मी त्यात कधीही पाऊल टाकणार नाही. तथापि, मी माझी आशा जिवंत ठेवली कारण त्याचे वचन म्हणते की तो मला *"भावी सुस्थितीची आशा"* देईल, आणि त्याने असे सिद्ध केले आहे जे *"डोळ्यांनी पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही."* त्याचे वचन हे देखील म्हणते की जर मला परमेश्वराच्या ठायी आनंद होईल, तर तो माझे मनोरथ पूर्ण करील. माझी परिस्थिती अधिकाधिक वाईट होत गेल्यासारखी वाटत असली तरीही त्याचे वचन टिकून राहिले. मी त्याच्या वचनास धरून राहिलो. त्याचे वचन माझ्या आशेचा आधार बनले. आणि आता, मी हेच स्वप्न खरे होतांना पाहत आहे. हालेलूया!

## तुमच्या मुलांसाठी आशा

तुमच्यापैकी काही जण तुमच्या मुलांबद्दल आशा गमावत असतील. तुम्ही त्यांस उत्तम शिक्षण दिले असेल आणि त्यांना देवाच्या वचनातून शिकविले असेल, पण सध्या, ते जीवनातील अशा स्तरावर आहेत जेथे ते अशा गोष्टींत गुंतून पडले आहे ज्याची तुम्ही कधी कल्पनाही केली नव्हती. कदाचित त्यांनी त्यांचे शिक्षण सोडून दिले आहे, आणि मद्यपान आणि मादक पदार्थ घेऊ लागले आहेत. तुम्ही दिलेली सर्व शिकवण वाया गेल्यासारखी वाटत आहे. तुम्ही विचार करीत असाल की इतक्या वर्षांचे तुमचे कठीण परिश्रम जे तुम्ही त्यांच्यासाठी दिले ते व्यर्थ ठरले आहे. तुम्ही तुमच्या मुलांसाठी आशा सोडण्याच्या मार्गावर असाल. मी तुम्हांला प्रोत्साहन देतो आणि म्हणतो, "आशा सोडू नका." देवाचे वचन म्हणते,

**स्तोत्रसंहिता 112:1,2**

**[1] परमेशाचे स्तवन करा! जो मनुष्य परमेश्वराचे भय धरतो आणि ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे तो धन्य!**

**[2] त्याची संतति पृथ्वीवर पराक्रमी होईल; सरळ जनांचा वंश आशीर्वादयुक्त होईल.**

तुम्ही प्रभूस म्हणू शकता, "मी तुझ्या वचनाची आशा धरत आहे. तुझे वचन म्हणते की माझी संतती पृथ्वीवर पराक्रमी होईल." याचा अर्थ तुमची मुले या पृथ्वीवर काहीतरी होतील. ती देवाच्या राज्यासाठी काहीतरी करतील. ती ह्या पृथ्वीवर वाया जाणार नाहीत. ती देवासाठी प्रभाव टाकतील.

**यशया 54:13**

**तुझी सर्व मुले परमेश्वरापासून शिक्षण पावतील; तुझ्या मुलांना मोठी शांती प्राप्त होईल.**

वरील वचनास तुमच्या आशेचा आधार ठरू द्या. आशा धरीत राहा. कदाचित आज जे काही तुम्ही म्हणत आहा त्याकडे तुमचे मूल

कानाडोळा करीत असेल. पण तरीही आशेचे कारण नसतांनाही तुम्ही त्याच्या वचनात आशा बाळगा.

## आरोग्यप्राप्तीसाठी आशा

तुमच्यापैकी काही जण आजार आणि रोग यामुळे त्रस्त असाल आणि डॉक्टरांनी तुम्हाला सांगितले असेल की तुम्हाला कुठलीच आशा नाही. वचन देवाविषयी काय म्हणते ते येथे आहे.

**स्तोत्रसंहिता 103:3**
**तो तुझ्या सर्व दुष्कर्मांची क्षमा करतो; तो तुझे सर्व रोग बरे करतो.**

तुम्हास ही आशा आहे. तुमची आशा जिवंत ठेवा. पवित्र वचनानुसार तुम्ही बरे झालेले व आरोग्य संपन्न आहात अशी कल्पना करा.

**नीतिसूत्रे 3:7,8**
**[7] तू आपल्या दृष्टीने स्वतःस शहाणा समजू नकोस; परमेश्वराचे भय धर आणि दुष्कर्मापासून दूर राहा.**
**[8] हे तुझ्या देहाला आरोग्य व हाडांना सत्त्व असे होईल.**

तुम्हाला देवाविषयी असलेली आदरयुक्त भीती तुमच्या शरीराला आरोग्य देते.

# 6
# आशाहीन परिस्थितीत मी काय करतो?

**रोम 4:17-21**

**17 "मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे" असे अब्राहामाविषयी शास्त्रात जे लिहिलेले आहे—त्याप्रमाणे तो आपल्या सर्वांचा बाप आहे. ज्या देवावर त्याने विश्वास ठेवला, जो देव मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो, त्याच्या दृष्टीने तो असा आहे.**

**18 "तशी तुझी संतति होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.**

**19 तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली;**

**20 परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचे गौरव केले;**

**21 आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खातरी होती.**

निराशाजनक परिस्थितीत देवाने ती परिस्थिती बदलावी म्हणून आम्ही काय करतो? आम्ही अब्राहामाच्या जीवनावरून काय धडा शिकू शकतो? त्याने काय केले ज्यामुळे देवाला निराशाजनक परिस्थिती बदलता आली? पवित्र शास्त्र म्हणते की अब्राहामाने आशा नसतांनाही विश्वास ठेवला की देवाने त्याला जे अभिवचन दिले होते तसा तो बनू शकतो (रोम 4:18). देवाने जे काही सांगितले आहे ते पूर्ण होईल यावर तुमचा विश्वास आहे का? उदाहरणार्थ, देवाचे वचन म्हणते, "जे काही तुम्ही हाती घ्याल ते सिद्धीस जाईल" आणि तुम्हाला हा विश्वास करण्याची गरज आहे. तुम्ही विश्वास धराल का?

## आशेने विश्वास ठेवा की देव जे काही बोलला आहे ते तुम्ही बनाल

देव आणि त्याचे वचन एक आहे. त्याच्या वचनात विश्वास हा देवामध्ये विश्वास आहे. तुम्हाला आशेचे कारण नसतांनाही आशा ठेवली पाहिजे. म्हणून, परिस्थिती निराशाजनक वाटत असली, तरीही तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे की देवाने जे अभिवचन दिले आहे ते तुम्ही बनाल. आशा सोडू नका.

## निराशयुक्त परिस्थितीने तुमच्या विश्वासाला शून्यता येऊ देऊ नका

अब्राहामाने *"विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशियाचे निर्जीवपण ही लक्षात घेतली"* (रोम 4:19). त्याने आपल्या शरीराच्या दशेचा आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितींचा विचार न करता आपल्या विश्वासास दुर्बळ होऊ दिले नाही. तुमच्या परिस्थितीची निराशाजनक स्थितीमुळे तुमचा विश्वास दुर्बळ होता कामा नये. सभोवताली पाहून असे म्हणू नका, "हे दुरूस्तीच्या पलीकडे आहे."

तथापि, याचा अर्थ हा नाही की आपण परिस्थिती नाकारली पाहिजे. तुमच्या परिस्थितींच्या वास्तविकतेने तुमचा विश्वास दुर्बळ होता कामा नये एवढेच. त्या ऐवजी, तुमच्या कल्पनेच्या "कॅनव्हासवर" तुम्हांला दिलेल्या अभिवचनाच्या भावी परिणामाचे चित्र तुम्ही "रंगविले" पाहिजे. उदाहरणार्थ, स्वतःला पूर्णपणे बरे झालेले पहा, स्वतःला जीवनात यशस्वी झालेले पहा, तुमचे वैवाहिक जीवन सुधारलेले व पुनर्स्थापित झालेले असे पहा, तुमची मुले देवाची सेवा करीत आहेत आणि त्याच्या मार्गावर चालत आहेत असे पहा. देवाच्या वचनावर आधारित असे चित्र रंगवा आणि ते वारंवार पाहत रहा!

एका रात्री, देवाने अब्राहामला त्याच्या तंबूतून बाहेर आणले

आणि त्याला आकाशातील तारे पाहण्यास सांगितले. आणि तो त्याला म्हणाला, *"तुझी संतती अशीच होईल"* (उत्पत्ती 15:5ब). मग अब्राहामाच्या मनात देवाच्या अभिवचनाचे "चित्र" उभे राहिले. तो त्याची संतती आकाशातील ताऱ्यांइतकी अगणित होईल हे "पाहण्यास" समर्थ झाला. जितक्यांदा अब्राहाम आपली शारिरीक स्थिती आणि त्याच्या पत्नीच्या गर्भाशयाच्या मृतावस्थेकडे पाहत असे, तितक्यांदा तो स्वतःला आकाशातील ताऱ्यांइतकी आणि समुद्रतटावरील वाळूच्या कणांइतकी अगणित संतती देण्याच्या देवाच्या अभिवचनाची स्वतःला आठवण करून देत असे.

कित्येकदा, मी स्वतःचे असे कल्पनाचित्र रंगविले आहे की मी हजारो लोकांना देवाचे वचन सांगत आहे. मी कल्पना केली की आमची स्थानिक मंडळी आमच्या शहरातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी आहे आणि प्रत्येक ठिकाणी कित्येक हजारो लोक आहेत. म्हणून, रविवारी सकाळी मंडळीत रिकाम्या खुर्च्या पाहून माझा विश्वास दुर्बळ झाला नाही कारण, माझ्या मनात मी आमच्या अंतिम लक्ष्यस्थानाचे चित्र बाळगत होतो. आणि आता, दर रविवारी, मी पाहतो की जी आशा मी धरली होती ती भौतिक वास्तविकतेमध्ये प्रगट झाली आहे. तुमची सध्याची परिस्थिती काहीही का असेना, तुमच्या लक्ष्यस्थानाचे चित्र मनात बाळगा आणि आशा धरीत राहा.

## निर्धार आणि धीर दाखवा

अब्राहामाच्या जीवनावरून आपण आणखी एका गोष्टीचे निरीक्षण करतो ती ही आहे की तो विश्वासात डळमळला नाही (रोम 4:20). तो देवाच्या अभिवचनांत अडखळला नाही. त्याने निर्धार व धीर दाखविले. आशेसोबत, निर्धार करणे आणि धीर बाळगणे अत्यावश्यक आहे. रोम 8:25 म्हणते, *"पण जे अदृश्य त्याची जर आपण आशा धरली तर धीराने आपण त्याची प्रतीक्षा करत असतो."* आपल्यापैकी अनेकांना विविध गोष्टींची आशा असली तरी, आपल्याला त्या लगेचच हव्या असतात.

दुसरीकडे, पवित्र शास्त्र आपल्याला ज्या गोष्टी दिसत नाहीत त्याची धीराने वाट पाहण्याचा सल्ला देते. सहज आशा सोडू नका. धीराने प्रतीक्षा करा. प्रेषित पौल म्हणतो,

**1 थेस्सल 1:3**
**आपल्या देवपित्यासमोर तुमचे विश्वासाने केलेले काम, प्रीतीने केलेले श्रम, व आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावरच्या आशेमुळे धरलेला धीर ह्यांचे आम्ही निरंतर स्मरण करतो.**

आशा ही धीर धरते! खरी आशा जी देवाच्या वचनावर आधारित असते, ती धीर धरते.

**विलापगीत 3:26**
**परमेश्वरापासून येणाऱ्या तारणाची वाट पाहणे आणि तीही मुकाट्याने पाहणे बरे आहे.**

जेव्हा तुम्हाला खरी आशा असते तेव्हा शांतता, स्तब्धता आणि संयमाची भावना असते. ते येणार आहे हे तुम्ही जाणता. तुम्ही विचलित, अस्वस्थ, चिडलेले नसता आणि तुम्हाला जे हवे ते प्राप्त करण्यासाठी प्रत्येकाला तुमच्या मार्गातून बाहेर काढू इच्छित नाही. उलटपक्षी, तुम्ही शांत राहता कारण तुम्हाला माहीत आहे की तुमचा जो विश्वास आहे त्यानुसार घडेल. तुम्ही दृढनिश्चयी राहता आणि तुम्ही धीराने वाट पाहता. दृढनिश्चय हे देवाच्या वचनाच्या सातत्यपूर्ण आज्ञाधारकतेद्वारे दिसून येते. बाहेर पडण्याचा सोपा मार्ग काढू नका. त्यामुळे तुमची परिस्थिती आणखी बिकट होईल!

## तुमचा आनंद राखून ठेवा; देवाची स्तुती करा

अब्राहामाने देवाची स्तुती केली (रोम 4:20). जेव्हा तुम्ही आशा बाळगता, तेव्हा तुम्हाला आनंद होतो. देवाचे वचन जे सांगते त्यावर आशा असल्यामुळे, तुम्ही आनंद करू शकता. अशा काही वेळा असतात जेव्हा तुम्ही परिस्थितीमुळे आनंदी होतात. परंतु, अशा

काही वेळा देखील असतात जेव्हा तुम्ही आशेने आनंदित होतात. तुमच्यापैकी ज्या लोकांना लहान मुले आहेत त्यांना माहीत आहे की त्यांचा वाढदिवस जवळ आल्यावर ते किती उत्साहित होतात! जेव्हा आमची मुलगी रूथ लहान असतांना तिचा वाढदिवस साजरा करीत असू, तेव्हा ती आदल्या आठवड्यापासूनच त्याची वाट पाहू लागत असे. ती "आशेमध्ये आनंदित" असे! ती उत्साहित असे, आणि तिच्या वाढदिवसाच्या आदल्या रात्री, ती म्हणत असे, "पप्पा, उद्या जेव्हा मी जागे होईन, तेव्हा तुम्ही म्हटले पाहिजे, 'गुड मॉर्निंग बर्थ डे गर्ल.'" दुसऱ्या दिवशी ती आपला वाढदिवस साजरा करणार आहे या आशेने तिला "आता" आनंद होत असे. अद्याप तिचा वाढदिवस यावयाचा असे, पण तिला असलेल्या आशेमुळे ती आनंदित होई. ख्रिस्ती ह्या नात्याने, आम्ही आशेमध्ये आनंदित व्हावे. आम्ही आनंदित व्हावे की देव सर्वकाही बदलून टाकेल आणि आमची परिस्थिती बदलून जाईल. आम्ही आशेमध्ये आनंदित होतो.

**रोम 15:13**
**आता आशेचा देव विश्वास ठेवण्यामुळे तुम्हांला संपूर्ण आनंदाने व शांतीने भरो, अशाकरता की, तुम्हांला पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने विपुल आशा प्राप्त व्हावी.**

**रोम 12:12**
**आशेने हर्षित व्हा; संकटात धीर धरा; प्रार्थनेत तत्पर राहा.**

आपण विपुल आशा बाळगू शकतो आणि आशेचा देव आम्हाला आनंद आणि शांतीने भरतो. जेव्हा आम्ही विश्वास ठेवतो तेव्हा आमच्या जीवनात आनंद व शांती येते. कधी कधी, जेव्हा प्रतिक्षेचा काळ लांबणीवर पडतो तेव्हा लोक तक्रार आणि कुरकुर करू लागतात. त्यांना आशेचे चित्र बाळगण्याची गरज आहे. सध्याच्या परिस्थितीमुळे रागावून न जाता आशेचे चित्र मनात बाळगावे. एक दिवस हे चित्र प्रत्यक्षात येईल हे जाणून तुम्हाला आनंद आणि शांती मिळेल.

**स्तोत्रसंहिता 42:5**
**हे माझ्या जिवा, तू का खिन्न झालास? तू आतल्या आत का तळमळत आहेस? देवाची आशा धर; तो मला दर्शन देऊन माझा उद्धार करतो, म्हणून मी त्याचे पुनरपि गुणगान गाईन.**

**स्तोत्रसंहिता 71:14**
**मी तर नित्य आशा धरून राहीन आणि तुझे स्तवन अधिकाधिक करत जाईन.**

जेव्हा व्यक्तीला आशा असते आणि तेव्हा आनंदाची जाणीव असते आणि देवाची स्तुती करण्याची क्षमता असते. कदाचित हे वाचत असतांना, तुम्ही निराशाजनक परिस्थितीत असाल आणि म्हणत आहा, "मी आनंदित कसा राहू शकतो?" पवित्र शास्त्र सांगते, "आशेत आनंदित राहा!" आम्ही देवाची स्तुती कशी करू शकतो? आम्ही आमच्याजवळ असलेल्या आशेमुळे देवाची स्तुती करू शकतो. आज, परिस्थिती वाईट दिसत असेल. आज, परिस्थिती कठीण असू शकेल. पण तरीही तुम्ही त्याची प्रशंसा करू शकता कारण तुम्हाला माहीत आहे की या गोष्टी सदैव टिकणार नाहीत. पवित्र शास्त्राचा परमेश्वर तो देव आहे जो निराशाजनक परिस्थिती बदलून टाकतो. आणि तो हे तुमच्यासाठी करेल. तुमची आशा जिवंत ठेवा. आशेमध्ये विश्वास ठेवा.

एक गीत आहे जे आम्ही गात असू. या गीताचे शब्द अतिशय प्रोत्साहनदायक आहेत.

# देवाचे स्तवन करा

ईलियट बी. बॅनिस्टर आणि माइकल विंसेन्ट हडसन द्वारा लिखित

## कडवे 1

जेव्हा तुम्ही संघर्षात असता
जे तुमच्या सर्व स्वप्नांचा चुराडा करते
आणि तुमच्या आशा क्रूरपणे चिरडल्या जातात
सैतानाच्या प्रकट युक्तींद्वारे
आणि तुम्हाला तुमच्या तीव्र इच्छेची जाणीव होते
ऐहिक भीतीच्या अधीन होण्यासाठी
तेव्हा ज्या विश्वासात तुम्ही उभे आहात तो तुमचा विश्वास नाहीसा होऊ देऊ नका.

## धृपद

प्रभूचे स्तवन करा
जे त्याचे स्तवन करतात त्यांच्याद्वारे तो कार्य करू शकतो,
प्रभूचे स्तवन  करा
कारण आमचा देव स्तवनात वसतो
प्रभूचे स्तवन करा
ज्या साखळदंडांनी तुम्हाला बांधून ठेवले आहे
ते तुम्हाला आठवण करून देतात की ते तुमच्या मागे शक्तीहीन होऊन पडतात
जेव्हा तुम्ही त्याचे स्तवन करता

## कडवे 2

सैतान लबाड आहे
आणि तो आमच्या मनात विचार टाकू इच्छितो
की आम्ही दीन आहोत
जेव्हा तो स्वतः जाणतो की
आम्ही राजाची मुले आहोत

म्हणून विश्वासाची सामर्थी ढाल उचला
कारण लढा जिंकलाच पाहिजे
आम्हांस माहीत आहे की येशू ख्रिस्त जिवंत झाला आहे
त्यामुळे काम आधीच पूर्ण झाले आहे

कदाचित तुम्ही हे पुस्तक वाचत असाल आणि म्हणत असाल, "मी निराशाजनक परिस्थितीत आहे." कदाचित ते तुमचे वैवाहिक जीवन, तुमचे घर, मुले, आर्थिक स्थिती, नोकरी, करिअर किंवा व्यवसाय असेल—आयुष्यात काहीही असू शकते. आम्हा सर्वांना अशा परिस्थितींना तोंड द्यावे लागते. मी तुम्हाला प्रोत्साहन देऊ इच्छितो—**आशा गमावू नका**. आशा न गमावणे अतिशय महत्वाचे आहे. जेव्हा तुम्ही आशा सोडता तेव्हा तुमचा अंतरात्मा दुर्बळ होतो. जेव्हा तुम्ही आशा गमावता तेव्हा तुम्ही नांगर नसलेल्या जहाजासारखे बनता. तुम्ही बुडायला लागण्याची शक्यता आहे. जेव्हा तुम्ही आशा सोडता तेव्हा विश्वासाचा उपयोग करणे खूप कठीण जाते कारण आशेवाचून तुम्ही विश्वास ठेवू शकत नाही.

देवावर आणि त्याच्या वचनावर आशा ठेवा. तुमच्या जीवनासंबंधाने देव जे काही बोलला आहे ते आठवा. तुमच्या घरासंबंधाने आणि वैवाहिक जीवनासंबंधाने देवाचे अभिवचन काय आहे? मिळालेल्या अभिवचनांस धरून राहा. त्याच्या वचनास तुमच्या आशेचे कारण बनवा. देवाने ते म्हटले आहे, म्हणून तुम्ही आशा धरू शकता की तुमच्या परिस्थितीत बदल घडून येईल. जेव्हा देवाची अभिवचने पूर्ण होतील तेव्हा ते कसे असेल याचे आपल्या मनात एक चित्र बाळगा. हे तुम्हाला तुमच्या आशा जिवंत राखण्यास मदत करेल.

देव *"जास्तीत जास्त, अर्थात आपल्या मागण्या किंवा कल्पना ह्यांपलीकडे आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीप्रमाणे आधिक्याने कार्य करण्यास जो समर्थ आहे"* (इफिस 3:20).

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास—आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च विषयी

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

- **किशोरवयीन मुलांसाठी**
- **वैयक्तिक सल्ला**
- **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने**
- **शैक्षणिक क्षेत्रात यशाची उणीव**
- **कामाशी संबंधित समस्या**
- **कुटुंब / संपत्ती / विवाहपूर्व वैवाहिक**
- **पालक / मुले /भावंडे / समवयस्क**
- **वर्तणूक विकार**
- **व्यक्तिमत्व विकार**
- **मानसिक / भावनिक अडचणी**
- **तणाव / आघात**
- **मद्यपान / अमली पदार्थांचे सेवन**
- **आध्यात्मिक समस्या**
- **लाईफ कोचिंग**

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**
**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998
**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru, Karnataka - 560043

***कृपया लक्षात ठेवाः*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play







*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

आम्ही आपले ध्येय गाठण्यास समर्थ होऊ किंवा नाही या विषयी आम्ही निराश होतो. कधी कधी, जीवनास अनपेक्षित वळण येते, आणि ज्या परिस्थितींसाठी आम्ही पूर्णपणे तयार नसतो त्या आमच्यापुढे प्रगट होतात. आम्ही स्वतःला रस्त्याच्या शेवटास पोहोचलेले पाहतो जेथून मागे वळण्याचा मार्ग दिसत नाही.

हे पुस्तक वाचणारे तुमच्यापैकी काही जण कदाचित निराशाजनक स्थितीमध्ये असू शकतात. हे तुमची नोकरी, कारकीर्द, शिक्षण, घर, विवाह, अथवा कुटुंबाशी संबंधित बाब असू शकते. जीवनात अनेक गोष्टी चुकल्या असतील. पण मी तुम्हांला प्रोत्साहन देऊ इच्छितो की पवित्र शास्त्राचा परमेश्वर मृतांस जीवन देण्यात—स्थिती आणि परिस्थिती ज्या मृत आणि निराशाजनक भासतात त्या बदलण्यास  तज्ञ आहे. निराशाजनक परिस्थितींना पार बदलून टाकण्यात तो तरबेज आहे. तो तुमच्या पक्षास असतांना, तुम्ही आशेविरुद्ध आशा बाळगू शकता.

प्रत्येक गोष्ट निराशाजनक दिसत असतांनाही, तुम्ही विजयी होऊन बाहेर पडू शकता. या  पुस्तकातील प्रोत्साहनाचे  साधे शब्द आम्ही आशा सोडू नये असे आवाहन करते. देवावर आणि त्याच्या वचनावर आशा ठेवा. तुमच्या जीवनासंबंधाने देव जे काही बोलला आहे ते आठवा. **आशा गमावू नका!**

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org